सेवावर्धिनी

# वार्षिक अहवाल २०१९-२०

सेवावर्धिनी


जलमित्र प्रशिक्षण
SHOT ON MI A2
MI DUAL CAMERA




SHOT ON REDMI Y3
AI DUAL CAMERA


JALDOOT 2.0
Training 1
Soil & Water Conservation







सेवावर्धिनी

सेवावर्धिनीच्या स्थापनेला २२ वर्ष पूर्ण झाली आहेत. दोन दशकांच्या या प्रवासात सेवाभावी संस्थाना पूरक सेवा पुरविणे या मूळ हेतू बरोबरच विविध आयामांवर सेवाभावी संस्थाना सोबत घेऊन सेवावर्धिनीचा कार्य विस्तार व क्षेत्र विस्तार होत आहे. सेवासंस्था, सामाजिक उत्तरदायित्व निधी उपलब्ध करून देणाऱ्या उद्योग जगतातील नामवंत कंपन्या यांच्या सेवावर्धिनीकडून असलेल्या वाढत्या अपेक्षा, विविध व नवनवीन सामाजिक समस्यांचे अध्ययन करून त्यावरील उपाय योजना सुचविण्याचा समाजधुरीणांचा वाढता आग्रह या सर्वाची सेवावर्धिनीला पूर्ण जाणीव आहे.

मार्गदर्शक विश्वस्त मंडळ, सक्रीय कार्यकारी मंडळ, सेवा तत्पर कर्मचारी वर्ग, तज्ञ मंडळी व हितचिंतक या सर्वांच्या योगदानाशिवाय हे आव्हान पेलणे शक्य नाही. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करून २०१९ – २० चा अपेक्षा उंचावणारा अहवाल सादर करताना मनस्वी आनंद होत आहे.

सोमदत्त पटवर्धन

कार्यवाह, सेवावर्धिनी

# सेवावर्धिनी

सेवावर्धिनीची स्थापना १९९८ साली झाली. सेवावर्धिनी ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून अन्य सेवासंस्थांना पूरक सेवा देण्याचे काम करत आहे. आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, सामाजिक संघटन, ग्रामविकास, जलसंधारण, कृषी या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या देशभरातील विविध संस्थांना नोंदणी व संस्था संचालन, अहवाल, प्रकल्प लेखन (Project writing), विकासाच्या विविध विषयांवरील माहितीच्या कार्यशाळा, शासकीय योजनांची सांगड घालून देणे अशा अनेकविध सेवा व मार्गदर्शन गेल्या २२ वर्षांपासून देत आहे.

सेवावर्धिनीचे कार्यकर्ते अनेक सामाजिक प्रश्नांशी संबंधित प्रकल्पावर काम करत आहेत. हे प्रकल्प योग्य पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षण, प्रश्नांची निश्चिती करून त्यावर उपाययोजना ठरवणे, विषयाशी निगडीत तज्ञांचे मार्गदर्शन घेणे, तांत्रिक सहाय्य उपलब्ध करणे, प्रकल्प राबवण्यासाठी रचना करणे इ. कामे सेवावर्धिनी करते. सामाजिक प्रश्नांची जाणीव व ते प्रश्न सोडवण्यासाठीची तळमळ असणारा मोठा स्वयंसेवकांचा गट समाजात आहे केवळ त्यांच्या सहकार्यानेच हे व असे अनेक प्रकल्प यशस्वी करणे सेवावर्धिनीस शक्य झाले आहे.

सेवावर्धिनी

## ध्येय

- ध्येयप्रेरित व समर्पित कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांच्या सामुहिक प्रयत्नांमधून बलशाली समाज उभा करणे.

## ध्येयपथ

- सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सबलीकरण करणे.
- सामुहिक प्रयत्नांमधून विकासोन्मुखी कार्यक्रमांच्या आधारे व्यापक सामाजिक उत्कर्षासाठी प्रयत्न करणे.
- लोकसहभागातून सामाजिक विश्वासाचे वातावरण निर्माण करणे.

## उद्दिष्टे

- सामाजिक विकासाच्या माध्यमातून लक्षावधी देशबांधवांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांवर व्यवहार्य उपाय योजना अमलात आणण्यासाठी स्वयंस्फुर्तीने प्रत्यक्ष काम करणाऱ्या सेवा संस्थाना प्रोस्ताहित व मदत करणे.

## मूल्ये

- पूर्ण समर्पित व ध्येय प्रेरित होऊन काम करणे
- पारदर्शकता
- आधुनिक व व्यावसायिक दृष्टीकोन
- राष्ट्रीय एकता व समरसता
- वंश, पंथ, जात, धर्म, रंग, वय, लिंग व शिक्षण निरपेक्षता
- सर्व वैधानिक व कायदेशीर गोष्टींची पूर्तता

# संस्था रचना

- सल्लागार मंडळ
  - विश्वस्त मंडळ
    - कार्यकारी मंडळ
      - मुख्य कार्यकारी अधिकारी
        - लेखापाल
        - मनुष्यबळ व्यवस्थापक
        - प्रकल्प व्यवस्थापक (३)
          - प्रकल्प समन्वयक (९)
          - प्रकल्प सल्लागार (४)

सेवावर्धिनी

# कार्यकारी मंडळ

## मानद अध्यक्ष

मा. श्री. प्रमोद जी चौधरी
संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष प्राज इंडस्ट्रीज लि.

## विश्वस्त मंडळ

मा. डॉ. उपेंद्र कुलकर्णी
मा. तुकाराम नाईक
मा. किशोर देसाई
मा. सोमदत्त पटवर्धन

| | |
|---|---|
| श्री. किशोर देसाई | कार्याध्यक्ष |
| श्री. सोमदत्त पटवर्धन | कार्यवाह |
| श्री. अनिल व्यास | सहकार्यवाह |
| श्री. प्रशांत मोराणकर | सहकार्यवाह |
| सौ. माणिक दामले | सहकार्यवाह |
| श्री. विवेक भागवत | सहकार्यवाह |
| श्री. जयंत काकतकर | कोषाध्यक्ष |
| श्री. चंद्रशेखर कुलकर्णी | कार्यकारिणी सदस्य |
| सौ. पद्मा कुबेर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. जयराम फणसळकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. देवदत्त टेंभेकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. योगेश्वर गर्गे | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. प्रमोद कुलकर्णी | निमंत्रित सदस्य |

# सेवावर्धिनी

## संस्था सक्षमीकरण



## अभिनव प्रकल्प



## संस्था सक्षमीकरण - पूरक सेवा

- PRA, सर्वेक्षण
- अभिलेखन (Documentation)
- मूल्यांकन (Evaluation)
- संसाधन उभारणी (Resource Mobilization)
- संस्था संचालन प्रशिक्षण







## अभिनव प्रकल्प

- ग्राम विकास
- जल संधारण
- उपजीविका
- जलमित्रा
- सामाजिक विकास








सेवावर्धिनी

# संस्था सक्षमीकरण

संस्था संचालन, अहवाल लेखन, प्रकल्प प्रस्ताव लेखन (Project writing), हिशोब व्यवस्थापन, विकासाच्या विविध विषयांवरील माहितीच्या कार्यशाळा, CSR शी जोडून देणे, शासकीय योजनांची सांगड घालून देणे अशा अनेकविध सेवा यासाठी गेली ४ वर्ष सेवावर्धिनी पुढील संस्थाना सतत मार्गदर्शन करत आहे.

| संस्था | स्थान | कामाचा विषय |
|---|---|---|
| माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान | सांगोला, सोलापूर | महिला आणि बाल कल्याण |
| नीड | खैरगाव, यवतमाळ | शिक्षण, महिला सक्षमीकरण |
| भगिनी निवेदिता प्रतिष्ठान | सांगली | महिला सक्षमीकरण |
| संपूर्ण बांबू केंद्र | लवादा, धारणी, अमरावती | रोजगार निर्मिती |
| हिंदुस्तान जागरण | पुणे | सामाजिक विकास |
| स्व. बाबुराव दौंडकर स्मारक समिती | रांजणगाव, ता. शिरूर, जि. पुणे | ग्राम विकास |

# संस्था सक्षमीकरण

- हेतू - माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांसाठी संस्था संचालनाच्या काही महत्वाच्या विषयांवर आधारित प्रशिक्षण
- स्थान – माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान कार्यालय – सांगोला, सोलापूर
- या प्रशिक्षणासाठी संस्थेचे १८ कार्यकर्ते उपस्थित होते.
- प्रशिक्षण दिनांक – १७ नोव्हेंबर २०१९
- विषय –
  - ✓ कार्यालयीन व्यवस्थापन
  - ✓ कायदेशीर तरतुदी
  - ✓ संवाद
  - ✓ निधी उभारणी आणि नियंत्रण







# संस्था सक्षमीकरण

- सोलापूरमध्ये काम करणाऱ्या सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींसाठी प्रिसिजन गप्पा – निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती
  या कार्यक्रमातून संस्था संचालन विषयासाठी प्रशिक्षणाची दिशा निश्चिती
- सोलापूर जिल्ह्यातील ६९ संस्थांचे १०९ कार्यकर्त्यांचे संस्था संचालन विषयातील प्रशिक्षण
- दिनांक – २२, २३ फेब्रुवारी २०२०
- प्रशिक्षणात झालेली सत्र -
  - ✓ ओळख
  - ✓ कल्पक प्रकल्प – उद्दिष्टे व ध्येय
  - ✓ प्रकल्प कसे सुचतात?
  - ✓ प्रकल्प पूर्वतयारी व व्यवस्थापन
  - ✓ धर्मादाय आयुक्तालय – संस्था नोंदणी नियम व कायदा
  - ✓ कार्यालयीन हिशोब व व्यवस्थापन
  - ✓ अनुभव कथन – डॉ. दिवाकर कुलकर्णी, हेडगेवार रुग्णालय, संभाजीनगर












# संस्था सक्षमीकरण

## मेळघाट सपोर्ट ग्रुप

- हेतू – मेळघाटातील संपूर्ण बांबू केंद्र या संस्थेची माहिती पुण्यातील नागरिकांपर्यंत पोहोचावी, तेथील बांबू पासून बनलेल्या वस्तूंची विक्री करणे आणि तेथील कामासाठी निधी आणि वस्तूंचे संकलन करणे.
- या वस्तूंच्या विक्रीसाठी फेब्रुवारी २०१९ पासून पुण्यामध्ये एक दुकान सुरु केले आहे.
- वर्षभरात ३.८५ हजार रुपयांची वस्तू विक्री
- कपडे संकलन – ३, ४ व ५ मे २०१९
- १८ क्विंटल
- सुमारे १ लाख ७० हजार रुपयांची राखी व राखी किट विक्री आणि ३३००० रुपयांची आकाश कंदील विक्री
- या कार्यक्रमामध्ये झाबुआ येथील शिवगंगा अभियानाचे मा. महेश जी शर्मा यांचे अनुभव कथन झाले.






## समर्थ भारत – संस्था सक्षमीकरण

- दिनांक ११ मे २०१९ रोजी समर्थ भारतशी संलग्नित पुणे महानगरातील संस्थांसाठी ‘सामाजिक संस्थेतील मनुष्यबळ व्यवस्थापन’ या विषयावर सत्र घेण्यात आले.
- या सत्रासाठी २२ संस्थांचे ४३ प्रतिनिधी उपस्थित होते.

# सेवा संगम २०२०

हेतू –

- <u>सेवा दर्शन</u> – पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील विविध सामाजिक कृतीशील संस्थांच्या कार्याचं दर्शन व प्रेरणा मिळावी यासाठी २ दिवसाचे प्रदर्शन
- <u>सेवा प्रशिक्षण</u> – प्रांतातील सेवा संगम प्रशिक्षणांसाठी येणाऱ्या संस्थांच्या प्रत्येकी तीन कार्यकर्त्यांचं प्रशिक्षण

वैशिष्ट्ये -

- १०० संस्थांचे stall
- २५ संस्थांचे stalls
- १२ Foodstalls - बचत गटाच्या माध्यमातून बनवलेल्या खाद्य पदार्थांची विक्री



- <u>सेवा कट्टा</u> - प्रदर्शिनी पहायला येणाऱ्यांसाठी सेवा कार्याची प्रेरणा मिळावी या दृष्टीने थोडक्यात विषय मांडणी व सेवा उपक्रम यांवरील चर्चा
  - अ. कुटुंब व्यवस्था आणि आदर्श पालकत्व -
  - ब. गुणवत्ता पूर्ण शिक्षण
  - क. स्वयंस्फूर्त कार्यकर्ता
  - ड. कचरा व्यवस्थापन
  - इ. आप्पत्ती व्यवस्थापन



- <u>सेवा प्रशिक्षण</u> – सेवा संस्थांच्या प्रामुख्याने तीन श्रेण्यांच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण
  - अ. संस्थेचे विश्वस्त / पदाधिकारी
  - ब. कार्यकारी अधिकारी किंवा व्यवस्थापकीय गट
  - क. क्षेत्र कार्यकर्ता
- सेवावर्धिनीकडे सेवा संगम मधील प्रशिक्षणाची जबाबदारी होती.

# जलमित्रा

- हेतू – हडपसर भागामध्ये ५० लाख लिटर पाण्याची बचत करणे
- फंडिंग एजन्सी व सहयोगी संस्था - अमनोरा येस फौंडेशन
- प्रत्यक्ष केलेले काम
  - ✓ उद्घाटन – दिनांक २१ जुलै २०१९ - घरकाम करणाऱ्या १८०० महिलांचा सहभाग
    - मान्यवर उपस्थिती अमनोरा फौंडेशन चे अध्यक्ष श्री अनिरुद्ध देशपांडे, सेवावर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री किशोरजी देसाई व प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध कलाकार श्रुती मराठे
    - पाणी बचतीच्या या मोहिमेला जलमित्रा असे नाव देण्यात आले व या नावाचे उद्घाटन अमनोरामध्ये घरकाम करणाऱ्या एका महिलेच्या हस्ते करण्यात आले.
    - या कार्यक्रमात महिलांनी घरात पाणी कसं येत याचा नकाशा काढला, भरपूर महिलांनी पहिल्यांदा हातात पेन धरलं.








# जलमित्रा

सेवावर्धिनी

- @३०० महिलांनी गणपतीची आरती केली, जलचक्र सादरीकरणाचा विशेष देखावा केला होता.
- अमनोरा मधील ५ tower मध्ये महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले, @ २०० महिलांना याचा लाभ घेता आला. – सह्याद्री हॉस्पिटल आणि रोटरी क्लबच्या सहयोगाने ही शिबिरे पार पडली.
- प्रत्यक्ष गृहभेटी
- वरील ५ ठिकाणी प्रत्येकी ४ दिवसांचे ‘जलमित्रा प्रशिक्षण वर्ग’ घेण्यात आले. यामध्ये पाणी मोजणी, जल साक्षरता पाणी बचतीचे उपाय याशिवाय वैयक्तिक आरोग्य, आहार, व्यायाम व आर्थिक साक्षरता याविषयी मार्गदर्शन केले. एकूण २३८ महिला या वर्गांमध्ये सहभागी झाल्या.
- सर्व महिलांसाठी आरोग्य तपासणी व उपचार शिबीर घेण्यात आले, यामध्ये तपासणीनंतर महिलांना औषधांचे वाटप करण्यात आले. सत्य साई सेवा मंडळ
- सर्व प्रशिक्षणार्थी महिलांचा मेळावा – विविध गुणदर्शन कार्यक्रम – या कार्यक्रमामध्ये २ जल शिक्षिका व २० जलमित्रा चॅम्पियन यांची घोषणा केली.









# जलदूत 2.0

सेवावर्धिनी

- जलदूत १.० हा प्रकल्प नोव्हेंबर २०१७ मध्ये पूर्ण
- या आगळ्या वेगळ्या प्रकल्पाचे यश आणि गरज लक्षात घेऊन -

  जलदूत २.० या प्रकल्पाची आखणी
- प्रकल्पाचा उद्देश – गावातील एका कार्यकर्त्याला जलसंवर्धन व ग्रामविकास विषयक ज्ञान देऊन त्याच्यामार्फत गावात काम उभे करणे.
- हे जलदूत उभारणीचे काम महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यातील २५ गावातील सेवाभावी संस्था मार्फत करून संस्थाना जलसंवर्धनाच्या कामात जोडणे व सक्षम बनवणे






# जलदूत 2.0

- झालेली प्रशिक्षणे
    1. प्रकल्प परिचय कार्यक्रम – जून २०१९, पुणे
    2. मृदा व जलसंधारण – ऑगस्ट २०१९, औरंगाबाद
    3. भूजल अभ्यास व सर्वेक्षण – ऑक्टोबर २०१९, पुणे
    4. लोकसहभागीय ग्रामीण मुल्यावलोकन (PRA) – डिसेंबर २०१९ व जानेवारी २०२०,सांगली, जालना
    5. शेती व पूरक व्यवसाय – मार्च २०१९, कोल्हापूर

- शिवाजी विद्यापीठातील MSW विद्यार्थ्यांच्या बरोबर २५ गावांचा लोकसहभागीय ग्रामीण मुल्यावलोकन (PRA) केला.
- भेट दिलेली ठिकाणे – झाबुआ,मध्यप्रदेश ( शिवगंगा अभियान), हिवरेबाजार, WALMI, पाटोदा, कडवंची (जालना), कृषी विज्ञान केंद्र - खरपुडी, कृषी विज्ञान केंद्र - कण्हेरी मठ, कोल्हापूर

- मान्यवरांचे मार्गदर्शन – श्री. प्रमोद चौधरी (अध्यक्ष प्राज इ.लिमिटेड), श्री. महेशजी शर्मा (शिवगंगा अभियान झाबुआ), श्री. सर्जेराव ठोंबरे (GMNIRD, मराठवाडा विद्यापीठ), श्री. हिमांशू कुलकर्णी, प. पु. श्री अदुश्य काडसिद्धेश्वर स्वामी, श्री पोपटराव पवार, श्री विजय (अण्णा) बोराडे








# आशा की बूंदे

- हेतू - वर्षभर गावामध्ये स्वच्छ पिण्याचे पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी अभ्यास व नियोजन
- प्रकल्प प्रवर्तक संस्था – UNICEF, ACWADAM, GSDA
- क्षेत्र – आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील ३३ गावे
- अंतर्गत झालेले उपक्रम






✓ पथदर्शी ३ गावांमध्ये सविस्तर अभ्यास करून पेयजल सुरक्षितता व शाश्वतता आराखडे तयार

✓ दि.२८ नोव्हेंबर २०१९ - उगलेवाडी-फदालेवाडी गावातील भोजनेवाडी येथे शिवकालीन टाक्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण व जलपूजन

✓ CRP प्रशिक्षण वर्ग आंबेगाव व शिरूर

✓ जागतिक महिला दिनानिमित्त २ गावांमध्ये महिला आरोग्य विषयक जाणीव जागृती व Sanitary Pad वितरण

✓ २६ गावामध्ये पाणी तपासणी, विहीर मोजणी व पाऊस नोंद घेण्यासाठी तसेच गावाचे भौगोलिक व सामाजिक माहिती प्रकल्पामध्ये मिळवण्यासाठी आंबेगाव मध्ये १३ व शिरूर मध्ये ९ CRP ची नेमणूक

# नक्षत्र वन

- स्थान – जांभळी , पानशेत धरणाशेजारी पुणे
- फंडिंग एजन्सी – कमिन्स इंडिया, पुणे
- सहयोगी संस्था – ग्रीन थंब, पुणे
- खडकवासला येथील नक्षत्रवन नंतर दुसरे नक्षत्रवन हे जांभळी येथे उभे केले.
- भारतीय ज्योतिषशास्त्रानुसार २७ नक्षत्र आहेत, त्या प्रत्येक नक्षत्रासाठी एक मुख्य वृक्ष आहे तसेच एक पूरक वृक्ष आहे. या ५४ वृक्षांची रोपे आणून त्याचे शास्त्रीय पद्धतीने (नक्षत्रांच्या दिशांनुसार) रोपण करण्यात आले.
- यामुळे शास्त्रीय वन उभारणीचा अनोखा अनुभव मिळाला.





# जलसंधारण

सेवावर्धिनी

- स्थान - **बसर्गे, ता. गडहिंग्लज, कोल्हापूर**
- हेतू – गावातील शेतीसाठी पाणलोट क्षेत्राचा विकास
- फंडिंग एजन्सी – ONGC
- कामाचे स्वरूप –
  1. मणिकेरी यांच्या शेताजवळील नवीन सिमेंट बंधारा बांधणे
  2. गोणी वसाहत येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती व गाळ काढणे
  3. गावाजवळील गाय रानावर सलग समतल चर काढणे
- या कामामुळे बसर्गे गावातील साधारणपणे 100 हेक्टर वरील शेतीला फायदा झाला आहे
- कालावधी – मार्च २०१९ ते जून २०१९
- लोकार्पण कार्यक्रम – ११ जुलै २०१९
- उपस्थित मान्यवर – ONGC कंपनीचे CSR व्यवस्थापक श्री संजय नंदनवार, आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू श्री विक्रम पाटील व आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू श्री तारीफ अहमद, डॉ. राजेंद्र हिरेमठ, श्री सोमदत्त पटवर्धन, श्री देवदत्त टेंभेकर






# जलसंधारण कामे

सेवावर्धिनी

- स्थान - **बसर्गे, ता. गडहिंग्लज, कोल्हापूर**
- लोकार्पण कार्यक्रम – ११ जुलै २०१९
- उपस्थित मान्यवर – ONGC कंपनीचे CSR विभागाचे श्री संजय नंदनवार, आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू श्री विक्रम पाटील व आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू श्री तारीफ अहमद,जनसेवा बँकेचे उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, सेवावर्धिनी कार्यवाह सोमदत्त पटवर्धन, सहकार्यवाह देवदत्त टेंभेकर









# जलसंधारण

सेवावर्धिनी

- स्थान - **पालाणे - मांढरदेव, ता. वाई, जि. सातारा**
- हेतू – गावातील पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय व्हावी
- फंडिंग एजन्सी – ONGC
- कामाचे स्वरूप - सिमेंट कॉंक्रीटच्या १० लाख लिटर पाणी साठवण क्षमता असलेल्या टाकीची बांधणी
- कालावधी – मार्च २०१९ पासून काम अजून चालू आहे
- अतिशय दुर्गम ठिकाणी असणाऱ्या व वस्तीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता ही नसताना गावातील लोकांसाठी वर्षभर पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून हे काम हाती घेण्यात आले आणि हे काम अंतिम टप्प्यात आहे





# जलसंधारण

सेवावर्धिनी

- स्थान - **बालेघर, ता. वाई, जि. सातारा**
- हेतू – गावातील पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी
- फंडिंग एजन्सी – ॲटलास कॉप्को, बेल्जियम
- कामाचे स्वरूप – गावातील शिवकालीन योजनेतील टाक्याची पुर्नबांधणी व पाणीसाठा वाढवणे
- कालावधी – मार्च २०१९ मध्ये कामाला सुरुवात सद्यस्थिती अंतिम टप्प्यात
- शासनाच्या शिवकालीन टाक्याच्या योजनेतील पडझड झालेल्या कामाला दुरुस्त करण्याबरोबरच पाणीसाठा वाढवण्याच्या ह्या कामामुळे बालेघर गावातील लोकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी मदत झाली.





# ग्राम विकास

सेवावर्धिनी

- स्थान – दिवड, ता. मावळ, जि. पुणे
- हेतू – दिवड गावात सांडपाणी निचरा करण्यासाठी भूमिगत सिमेंट कॉंक्रीट गटार व्यवस्था उभी करणे.
- फंडिंग एजन्सी – ZS असोसिएट्स, पुणे
- दिवड गावामध्ये सिमेंट कॉंक्रीट पाईपच्या सहाय्याने सांडपाणी निचरा व व्यवस्थापन केले.
- कालावधी – मार्च २०१९ ते जून २०१९







# लोणावळा ग्रामविकास

सेवावर्धिनी

- श्री. अशोक सिंघल मेमोरिअल ट्रस्ट सोबत कामास सुरुवात
- आंदर मावळ आणि पवन मावळ परिसरातील ३१ गावांची निवड
- परिसरातील सर्व गावांच्या प्राथमिक भेटी पूर्ण झाल्या
- आंदर मावळ परिसरातील इंगळूण या गावाचा ६ वाड्यांसह मार्च २०२० मध्ये PRA पूर्ण केला.










# सीना खोरे जलसमृद्धी अभियान

- स्थान – नगर, बीड, उस्मानाबाद, सोलापूर या जिल्ह्यातील १३ तालुके
- हेतू – कायमस्वरूपी दुष्काळी असणाऱ्या सीना नदीच्या खोऱ्यामध्ये जल संधारणाच्या कार्यक्रमाद्वारे पाणलोट क्षेत्राचा विकास
- सहयोगी संस्था – सावित्रीबाई फुले महिला एकात्म  समाज मंडळ – औरंगाबाद, लोकसेवा समिती – उस्मानाबाद








# सीना खोरे जलसमृद्धी अभियान

सेवावर्धिनी

- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम –

- दि.२० मे २०१९ रोजी चिंचोली, ता. बार्शी जि. सोलापूर येथील श्री निलकंठेश्वर मंदिरासमोरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती व गाळ काढण्याच्या कामाचे भूमिपूजन

  उपस्थिती - पांगरीचे पोलीस उपनिरीक्षक श्री संतोष बडे, चिंचोलीचे उपसरपंच श्री दिलीप शिंदे, उद्योजक श्री संतोष शिंदे, तलाठी श्री सुनील चंदनशिव पांगरीचे सरपंच श्री युन्नुस बागवान, श्री तात्या घावटे



- चिंचोली, ता. बार्शी जि. सोलापूर येथील श्री निलकंठेश्वर मंदिरासमोरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती व गाळ काढण्याचे काम मे २०१९ ते जून २०१९ च्या दरम्यान पूर्ण करण्यात आले.

- पांगरी, चिंचोली, ढेमब्रेवाडी, घोळवेवाडी, जहानपूर, पांढरी या सहा गावांचे पाऊस मोजण्याचे काम सुरु आहे, या सहा गावांपैकी चिंचोली गावाचा जानेवारी २०२० मध्ये PRA पूर्ण करण्यात आला.

# शेतकरी सक्षमीकरण

- हेतू – शेतकऱ्यांना शेतीचे व्यवस्थापन शिकवून आर्थिक सक्षम बनविणे
- सहयोगी संस्था – नीड, यवतमाळ
- क्षेत्र – खैरगाव, यवतमाळ
- सावकाराकडून कर्ज न घेता, शेतकऱ्यांना बिनव्याजी अर्थ सहाय्य उपलब्ध करून देणे
- अंतर्गत झालेले उपक्रम –
    - ✓ एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रशिक्षण
    - ✓ एकूण लाभार्थी - २० शेतकरी





# भटक्या व विमुक्त जाती – जमातीतील नागरिकांचे सक्षमीकरण

सेवावर्धिनी

- हेतू – भटक्या व विमुक्त जाती – जमातीतील नागरिकांचे उपजीविकेच्या साधनांद्वारे सक्षमीकरण
- फंडिंग एजन्सी – वैयक्तिक देणगीदार
- क्षेत्र – सोलापूर जिल्हा
- एकूण लाभार्थी - अंदाजे ३०० कुटुंब
- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम –



- पारधी समाज
  - पारधी समाजातील व्यक्तींचे गोपालन व आधारित उद्योग याविषयी गोसंसाधन व अनुसंधान केंद्र, देवलापार येथे प्रशिक्षण – १२० जण
  - गायी देण्यापूर्वी सांभाळण्यासाठी करकंब येथे २७ जुलै २०१९ रोजी ७२ जणांचे प्रशिक्षण
  - २४ ऑगस्ट २०१९ रोजी - १० लाभार्थींना सोलापूरचे खासदार श्री काडसिद्धेश्वर स्वामी महाराज व मंत्री श्री. सुभाष देशमुख यांच्या हस्ते गाय वाटप कार्यक्रम करण्यात आला.
  - सुमारे ७० महिलांना बचत गट स्थापना आणि संचालन याविषयी मार्गदर्शन केले.



# भटक्या व विमुक्त जाती – जमातीतील नागरिकांचे सक्षमीकरण

सेवावर्धिनी

- इतर भटका समाज –
  - कैकाडी – बार्शी येथे महिलांचे २ गट स्थापन (२२ महिला) – उटणे आणि मसाले तयार करून विकणे - उद्योगास सुरुवात
  - ओतारी (११ पुरुष) – मार्डी येथे एका पुरुष गटाची स्थापना, नियमित बचत चालू, एकत्रित कच्चा माल खरेदी करण्यास उत्सुक
- बहुरूपी (११ पुरुष) – एका पुरुष गटाची स्थापना, नियमित बचत चालू, सर्वांचे निरनिराळे उद्योग, उद्योगासाठी कर्ज अपेक्षित
- वडार (११ महिला) – अक्कलकोट येथे एका महिला गटाची स्थापना, उदबत्ती तयार करून विक्री, वडापाव Stall, इ. उद्योगास सुरुवात
- कटबू – दोन महिला बचत गट स्थापन (२७ महिला), प्रशिक्षण घेउन शेळी पालन, शिवणकाम करण्यास उत्सुक
- अन्य समाजातील संपर्कित – अंदाजे १०० (कतारी, मसणजोगी, कोंची कोरवी, मदारी, वैदू, इ.)

सेवावर्धिनी

# समृद्धी




- हेतू- महिला बचत गटांची स्थापना करून महिलांच्या सक्षमीकरणाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा गाठणे. बचत गट म्हणजे केवळ पैशांची बचत करणे एवढेच बचत गटाचे उद्दिष्ट नसून त्यांच्या हातांना काम मिळवून देणे आणि स्वमिळकतीतील आत्मसन्मान मिळवून देणे हे आहे.
- फंडिंग एजन्सी - सिमेन्स गमेसा
- उस्मानाबाद जिल्ह्यातील २४ गावात ४१ महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली व प्रत्येक गटात १० महिला सदस्य सहभागी असल्याने प्रकल्पातील एकूण लाभार्थी संख्या ४२५ इतकी आहे.
- कालावधी – मे २०१९ ते मार्च २०२०



# समृद्धी

सेवावर्धिनी

- प्रत्यक्ष झालेले उपक्रम -
  - ✓ उस्मानाबाद जिल्ह्यातील २४ गावात मिळून ४१ महिलांच्या स्वयंसहायता बचत गटांची स्थापना
  - ✓ गाव पातळीवर काम करणाऱ्या महिला समन्वयकांना प्रकल्प कामाविषयीचे प्रशिक्षण
  - ✓ बचत गटातील महिलांनी मिळून तयार केलेल्या वस्तूंची प्रदर्शनी व स्पर्धा
  - ✓ या प्रकल्पात समाविष्ट असलेल्या २४ गावांचा सर्वे (PRA)
  - ✓ बचत गटातील महिलांना उद्योजकतेची प्रेरणा मिळावी यासाठी एक दिवसाची सहल, ज्यामध्ये विविध प्रकल्प ठिकाणांना भेट.
- मान्यवर भेट – सिमेन्स गमेसा कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) विभागाचे वरिष्ठ अधिकारी श्री. अरुण प्रसाद सर व श्री. प्रविण शिंदे यांनी २७ व २८ जानेवारी २०२० या दोन दिवशी ४ गावांना प्रत्यक्ष भेट देऊन बचत गटातील महिला सदस्यांशी संवाद साधला.





# वैभवश्री

- **पेण**
  - ✓ दिनांक ३० एप्रिल व १ मे २०१९ रोजी – वैभवश्री प्रशिक्षण वर्ग
  - ✓ सहयोगी संस्था - अहिल्या महिला मंडळ, पेण
  - ✓ १७ संस्थांचे ५२ प्रतिनिधी उपस्थित होते.
  - ✓ झालेली सत्र
    - ➢ बचत गट ते वैभवश्री
    - ➢ SWOT Analysis
    - ➢ आगामी उद्दिष्टे
  - ✓ विशेष उपस्थिती – श्री. सुंदर लक्ष्मण जी, सौ. निरुपमा देव, श्री.नरहर देव सर, श्रीमती चंद्रिकाभाभी चौहान, श्री. शिरीष पटवर्धन, पेण-पालीचे आमदार श्री.धैर्यशील पाटील, सौ. निलीमाताई पाटील, नगराध्यक्ष सौ. प्रीतम पाटील आणि अहिल्या महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. अश्विनीताई गाडगीळ उपस्थित होते.
  - ✓ अहिल्या महिला मंडळ संस्थेला भेट देण्यात आली.



- **जळगाव**
  - ✓ हेतू - जळगाव येथील जळगाव जनता सहकारी बँकेमार्फत चालवले जाणारे बचतगट वैभवश्रीच्या रचनेमध्ये आणण्याच्या दृष्टीने समन्वयकांचे प्रशिक्षण
  - ✓ तसेच औरंगाबाद येथील सावित्रीबाई फुले महिला एकात्मा समाज मंडळ व बळवंत नागरी सहकारी पतसंस्था यांच्याही समन्वयकांचे प्रशिक्षण.
  - ✓ एकूण ३४ कार्यकर्ते उपस्थित
  - ✓ या प्रशिक्षणात वैभवश्री गटाचे प्रत्याक्षिक सादर केले.

# सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल प्रकल्प



- हेतू – सॅनिटरी नॅपकीन – अविघटनशील कचऱ्याची विल्हेवाट लावणे
- फंडिंग एजन्सी – ARAI
- सहयोगी संस्था – जन आधार सेवाभावी संस्था – लातूर, पूर्णम इकोव्हीजन फौंडेशन
- क्षेत्र – पुणे शहरातील प्रभाग क्रमांक ३४
- अंतर्गत झालेले उपक्रम –
  - ✓ सिंहगड रोड - प्रभाग क्रमांक ३४ मध्ये जनजागृती कार्यक्रम झाले.
    - सोसायटी भेटी - २६१
    - कलेक्शन ठिकाणे – ११३
    - जनजागृती कार्यक्रम - २४
    - प्रकल्पात सहभागी झालेल्या महिला - २५५
- मान्यवर भेटी – मंजुषा नागपुरे, डॉ.उचगावकर, अविनाश कुलकर्णी, दीपाली मोरगावकर



# अरुणोदय

सेवावर्धिनी

- हेतू- किशोरवयीन मुलांना योग्य, उपयुक्त, शास्त्रशुद्ध माहिती देणे व ही माहिती देण्यासाठी किशोरमित्र प्रशिक्षित करणे.
- फंडिंग एजन्सी व सहयोगी संस्था – जिजामाता स्मारक समिती, दृष्टी स्त्री अध्ययन केंन्द्र
- प्रत्यक्ष केलेली कामे
  - ✓ किशोरमित्र प्रशिक्षण १ – सहभागी कार्यकर्ते - ३७ – डोंबिवली, जन कल्याण समिती
  - ✓ किशोरमित्र प्रशिक्षण २ – सहभागी कार्यकर्ते १३ – पुणे – जिजामाता स्मारक समिती
  - ✓ किशोरमित्र प्रशिक्षण ३ - सहभागी कार्यकर्ते ५० – धाराशिव (उस्मानाबाद) विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्था, रिफ्लेक्शन कौन्सेल्लिंग सेंटर
  - ✓ किशोरमित्र प्रशिक्षण ४ – सहभागी संस्था – १५, किशोरमित्र – २५ , पुणे
  - ✓ दिशा २०२० – संस्थांची किशोर विकास विषयामधील कामाची वाटचाल - संस्था १८, पदाधिकारी ३१ - पुणे
- मान्यवरांच्या भेटी - शरदराव खाडिलकर, आशा साने, अंजली देशपांडे, शेषाद्री डांगे, अलका जोगळेकर

# अरुणोदय

सेवावर्धिनी

- प्रकल्पांतर्गत झालेले उपक्रम – फोटो












# सेवावर्धिनी
















पारधी समाजातील सदस्यांचे स्वागत

कुर्डुवाडी / प्रतिनिधी

भारत रुरल लाईव्हली हुडस फौंडेशन, अभिनव भारत समाज सेवा मंडळ व सेवावर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या भटके विमुक्त जाती जमातींचे उपजीविकेच्या साधनांद्वारे सक्षमीकरण व संवर्धन कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेऊन परत आलेल्या पारधी समाजातील सदस्यांचे माढा तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी कुर्डुवाडी शहरात स्वागत केले.

नागपूर येथील गो विज्ञान अनुसंधान केंद्र मध्ये ते ११० पारधी महिला व पुरुष यांचे गोपाल उत्पादन, संगोपन याच्यावर प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये गायीच्या शेणापासून अगरबत्ती, गोमूत्रापासून गोझरण अर्क, गांडूळ खत निर्मिती अशा उत्पादनाचे प्रशिक्षण मिळाल्याचे व बचत गटाच्या माध्यमातून मोठी बचत होऊन उद्योगातून उत्पन्न मिळत असल्याचे प्रशिक्षणार्थींना सांगितले. यावेळी चंपाबाई चव्हाण, कमल पवार, विमल काळे, लक्ष्मण चव्हाण, कुबेर पवार, संतोष राऊत, सोमनाथ कुलकर्णी, गणेश शेजाळ, करण भगत, महावीर धोत्रे, किर्वे आदीसह तालुक्यातील स्वयंसेवक उपस्थित होते.









# देणगीदार

- प्रिसिजन फौंडेशन
- ॲटलास कॉप्को (इंडिया) लि.
- ॲटलास कॉप्को, बेल्जियम
- सिमेन्स गमेसा रिन्युव्हेबल पॉवर प्रायव्हेट लि.
- येस फौंडेशन - अमनोरा township
- ओ. एन. जी. सी.
- झेड. एस. असोसिएट्स
- युनिसेफ
- रोटरी इंटरनॅशनल व अन्य क्लब
- ए. आर. ए. आय
- कमिन्स इंडिया लि.
- एक्सोटिक झेनिनी
- सर्व वैयक्तिक देणगीदार

# श्रद्धांजली

* पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

* शान्तिः शान्तिः शान्तिः !!!

अहवाल वर्षामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक, कलावंत, शिक्षण तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते दिवंगत झाले, त्यांना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रद्धांजली.

ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांती देवो..!!